तृतीय क्रमांक : श्रीम. संध्या गाडकरी (१६)

(1)

कथेचे नांव ...

हौस - फुंच बूटांची --

मे महिना --

गावाबाहेरील टेकडीच्या खाली असलेले विस्तीर्ण भले मोठे प्रचंड असे मैदान. दर सुट्टीत हे मैदान गावकरी कोणा -- कोणाला भाड्याने देत असत तेवढेच गावाच्या विकासासाठी मिळालेल्या पैशाचा उपयोग होत असे.

त्यावेळी हे मैदान भल्या मोठ्या सर्कशीला देण्यात आले होते. सर्कशीची जाहिरात खुपच जोरदार चालू होती. सजवलेला हत्ती रोज गावातून फेरी मारत असे. त्यावर बसून फिरण्याची हौस गावातील लहान लहान मुले पुरवीत असत.

सर्कशीतील सर्व कलाकार पण सराव करण्यात अत्यंत दंग असत.

पण -- अद्यातच एक कलाकार मात्र आनंदी दिसत नव्हता. आपण काहीतरी जगावेगळे करून सर्वांच्या पुढे जायचे हाच त्याचा ध्यास!

कृष्णा तसा सर्वसाधारण मुलांपैकीच एक घरची परिस्थीती अत्यंत गरीब. व भावंडे, त्याची आई कसे बसे ४ ते ५ घरची कामे करून घर मोठ्या मुश्कीलीने चालवत असे.

एक खेदाची गोष्ट म्हणजे सर्व भावंडांमध्ये कृष्णा हा उंचीने खुपच बुटका होता. नोकरी शोधता शोधता शेवटी कशीबशी त्याला ह्या सर्कशीत नोकरी मिळाली.

हे कृष्णाला काही पसंत नव्हते. पण काय करणार? दोन वेळच जेवण व थोडाफार रकमेचा पगार! तो पगार सुध्दा त्याला पुरत नव्हता. मग हौस मौज तर दुरच

कृष्णाला सुंदर सुंदर पायातले बूट व रंगीत कपडे घ्याचे फारच वेड

रविवारी बाजारात जाऊन सर्कशीतील सर्व मुले - मुली खूप खरेदी करत.

## हौस ऊंच सूराची



पण कृष्णा मात्र एकटाच कसल्या तरी विचारात असे. त्याचे सोबती कृष्णाला त्यांना नको असलेले जुने पायातले बूट चपलु, कपडे देत असत. त्यातच तो समाधान मानत असे.

ह्या सर्कशीचे सर्वच खेळ सुंदर, थरारक असत. प्रथम प्रथम कृष्णाला साफसफाई करणे सर्वांचे कपडे धुणे. भांडी घासणे. जनावरांची साफसफाई करणे त्यांना वेळच्यावेळी खाणे पिणे देणे वगैरे त्यातच त्याचा सर्व वेळ जात असे

पण झाले काय की, त्या सर्कशीचा अत्यंत थरारक असा खेळ म्हणजे चाकू अचूक मारणे, तो पण लांब अंतरावरून मापे घेऊन!

त्यात एक ठराविक लाकडाच्या सुंदर कमानीत एक माणूस न हलता उभा रहायचा. त्याच्या बाहेरच्या बाजूला सर्व कमानीत चाकू मारायचे. ते पण ठराविक अंतरावर, अंतरांतरावर असलेल्या ठिकाणी! जरा सुध्दा नेम चुकता नये नाहीतर उभा रहाणाऱ्याचा जीव गेलाच म्हणून समजा!

ह्या कमानीत उभा रहाणारा मुलगा काही कारणाने आजारी पडला व त्यातच त्याचे निधन झाले!!

सर्कशीच्या मालकाने ते काम कृष्णाला दिले. त्याने निरिक्षण केले होते की कृष्णा तासनुतास न हलता कोणत्या तरी विचारात असे, तो हे काम करेल म्हणून!

कृष्णा आपल्या नव्या कामावर खुष होता. पगार पण वाढला होता. चाकू फेकून मारायचे हे काही साधे-सोपे काम नव्हते. हा खेळ खेळणारा कलाकार पण मनापासून आपल्या कामात दंग असायचा.

त्यांची प्रॅक्टीस पण खूपच जोरात चालु असायची. कृष्णाला तासनतास अगदी न हलता कमानीमध्ये एकाच ठिकाणी शांत उभे रहाण्याचे काम होते. तो पण ते काम खुप निष्ठेने करत असे.

त्याला त्याचे श्रीमंत श्रीमंत होण्याचे स्वप्न पूर्ण करायचे होते

## हौस ऊंच बूटाची



चाकू मारायचे ठराविक अंतर कृष्णाला सुध्दा पाठ होते झाले होते खरच किती धोकादायक आणि जबाबदारीचे काम! येक प्रसंग आला तर जीवावरचे सुध्दा!

चाकू फेकून मारणारा कलाकार तर कृष्णाकडून खुपच कसरत करून घेत असे. डोक्यापासून ते पायापर्यंतचे अंतर कबर खांदे, मानेपासून सर्व चाकू मारायचे ते पण डोळे मिटून किती धोकादायक काम है? तेवढीच कामावर निष्ठा व आत्मविश्वास पण हवाच!

कृष्णा निश्चिंत पणे उभा राहत असे. जरासुध्दा हालचाल नाही. जर हालचाल झाली तर चाकू सरळ अंगातच जायचा किती जिवावरचे खेळ असतात हे! खरच धन्य ते कलाकार!

कृष्णा अतिशय सावधानता बाळगून सहनशीलपणे त्या चौकटीत उभा रहायचा. चाकू फेकून मारणारा कलाकार पण त्यामुळे पुर्ण निर्धास्त राहून आपल्या कामाची प्रक्टीस करायचा

कृष्णाला पैसे जमवून सुंदर महागड्या वस्तू घेण्याचा ध्यासच लागला होता जणू! तऱ्हेतऱ्हेचे रंगी बेरंगी कपडे शिवून घ्यायचे व त्यावर उंच टाचेचे बूट! आणि ते पण मॅचिंगच! कारण त्याच्या पायात नेहमी जुन्या स्लीपरच असत.

कृष्णाचा डोक्यापासून ते पायातल्या स्लीपरपर्यंत सर्व उंचीची मापे चाकू मारणाऱ्या कलाकाराने अगदी पाठ करुन ठेवली होती व त्या पाठांतरावरच त्याचा खेळ अवलंबून होता.

कृष्णाचे आता मनसुबे तयार होत होते. गावाला घरी आंबडासाठी कपडे, आईसाठी जरीच्या किनारीची लाल रंगाची साडी. वगैरे. स्वतःसाठी रंगीत रंगीत ४ ते ५ शर्ट व प्रत्येक शर्टवर मॅचिंग रंगाचे फॅशनेबल ऊंच टाचेचे छान छान बूट! अरे वा मस्तच!

# हौस उंच बूटाची !



कृष्णाचे विचार सुरूच होते. नविन शर्ट व पँट त्यावर उंच टाचेचे बूट घालून कमीत कमी एक तास तरी सर्व कलाकारांसमोर मिरवायचेच ! हो मी त्यांच्या अवती भवती फिरुन त्यांच्यासारखाच मान मी खाणार – – –

सर्कस तर खूप जोरात चालू होती. सर्वच खेळाचे शो हाऊसफुल्ल होत असत. उत्पन्न तर भरपूर मिळत होते.

सर्वजण वाट बघत होते तो दिवस आज उजाडला ! कंपनीत खूप आनंदी वातावरण होते. सर्कसच्या तंबूला नेहमीपेक्षा जास्तच दिव्यांची रोषणाई केलेली होती. त्याचे कारण म्हणजे सर्कशीच्या मालकाच्या मुलीचा वाढदिवस होता. आज सर्वांनाच मालक जंगी पार्टी देणार होते. सर्वच, कलाकार नोकर चाकर आनंदात होते. संध्याकाळी पार्टी होती.

आज सकाळी कृष्णा पण आपल्या सहकार्यांसोबत खरेदीसाठी बाहेर पडला होता. खूपच आनंदी होता तो ! त्याने बरीच खरेदी केली. परत आल्यावर सर्वांनी भोजन केले. मालकाची पार्टी मजाच मजा !

कृष्णाने खरेदी केलेले बूट सकाळपासून घालूनच ठेवले होते. ते बूट फिरंगाला पण छान बसले होते. सर्वांसमोर त्याने खूप भाव खाल्ला. सर्वांनी त्याचे खूप कौतुक पण केले. संध्याकाळ झाली.

खेळाची वेळ जवळ येत होती. सर्वांची लगबग चालू झाली. दिवे लागले वाद्य-वृंद पण आपापल्या जागेवर जाऊन बसले. एक सुंदर - आनंदी वातावरण चालू झाले. हत्ती, घोडे, त्यांचे पण खेळ सुरू झाले. तारेवरची कसरत करणाऱ्या मुली खूप तयारीत होत्या.

प्रथम विदूषक आले. त्यांनी सर्वांना खूप हसविले. छान काम करून दाखवली.

(५)

# हौस उंच बूटाची!

पिंजऱ्यातले वाघ हत्ती, घोडे खूपच छान शिकवल्याप्रमाणे काम करत होते.

मध्येच सुंदर सुंदर-पक्षी त्यांच्या बोलीमध्ये गाणी गात होते

मालकाच्या मुलीच्या वाढदिवसाचा केक कापण्यात आला बापरे बाप! केवढा मोठा केक तो!

असे होता होता कुष्णाच्या खेळाचे अनाउन्स मेंट करण्यात आले. कुष्णा पण अगदी रूबाबात त्याच्या जागेवर जाऊन उभा राहिला खूप-खूप खुशीमध्ये होता तो. नंतर मुख्य कलाकार जो चाकूचा खेळ करणार तो आला. त्याने नमस्कार करून सर्वांकडे बघून हात फुंचावला व जवळच असलेल्या टेबलकडे गेला. तेथे सर्व चाकू लायनीत ठेवले होते. त्याने सुरवात केली.

एक एक चाकू तो मारत होता डोळे बंद होते. सुरवात खालून मारण्यात आलेल्या चाकूपासून साले सर्व चाकू मापाप्रमाणे तो मारतच होता होता फक्त वरचा चाकू राहिला होता! तो त्याने मारला-

हाय-हाय, कुष्णा एकदम मोठ्याने किंचाळला सर्वांना घाबरले रक्ताचा सडाच झाला होता कुष्णा धाडकन खाली पडला तो चाकू कुष्णाच्या कपाळावर घुसला होता।

असे कसे झाले सर्व कुष्णाजवळ गेले काय झाले कोणालाच कळत नव्हते. चेक करण्यासाठी कुष्णाची उंची पायापासून ते डोक्यापर्यंत मोजली त्या चाकू मारणाऱ्या कलाकाराने तर ती ठरलेल्या पाठ केलेल्या उंचीपेक्षा थोडी, अर्धी ते पाऊण इंच जास्त भरली! तेव्हा त्याच्या लक्षात आले कुष्णाने पायात ते नविन उंच टाचेचे बूट घातले होते!! आनंदाच्या भरात त्याने बूट काढलेच नाहीत व स्लीपर्स घालायला विसरला!

अरे देवा काय झाले हे!

उंच टाचेच्या बुटाची हौस अशा प्रकारे फिटली होती!